संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

Sangamner । MAHMAR/2018/75654 । वर्ष ८ । अंक ६५ । १२/७/२०२५ (दैनिक) । किंमत रु.२/- । पाने ४

लग्न म्हणजे बस्ता, बस्ता म्हणजे राजेंद्र
१९५९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर । बस्त्यासाठी खास सोय । नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग । होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट.. मिल असो वा मॉल.. सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल!
30% ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे MASALE — चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले
+91 9370584332
www.kothmiremasale.com

## हलगर्जीपणातून दोघांचा जीव घेणाऱ्या तिघांविरुद्ध सदोष मनुष्यवध!

### ठेकेदार कातोरे पिता-पुत्राचा समावेश | ठेकेदाराने परस्पर उद्योग केल्याचा धक्कादायक प्रकारही समोर



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

बंद असलेल्या आणि गेल्या अनेक वर्ष न उघडलेल्या गटारींमध्ये मोठ्या प्रमाणात विषारी वायूची निर्मिती होते हा सरळ सिद्धांत असताना संगमनेरच्या एका आडहत्यारी ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे दोघा तरुणांचा हकनाक बळी गेला. सध्या शहरात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांतर्गत भूमिगत गटारांचे **(पान ३ वर)**

■ गुरुवारी (ता.१०) दुपारी घडलेल्या या घटनेत आडहत्यारी ठेकेदार मुस्ताक बशीर शेख याचा हलगर्जीपणा ठळकपणे समोर आला आहे. त्याने कुठलीही पूर्वकाळजी न घेता या तरुणांना गटार स्वच्छ करण्यासाठी अपूऱ्या संसाधनांसह उतरवल्यानेच सदरची घटना घडली. त्याचप्रमाणे सध्या सांडपाणी प्रकल्पातंर्गत शहरातील सर्व गटारांवर ताबा असलेले रामहरी मोहन कातोरे यांच्यासह त्यांचे सुपूत्र निखिल यांनीही पालिकेला कोणतीही सूचना न देता परस्पर सदरची गटार उकरली त्यातून हा सगळा प्रकार घडला. कातोरे पिता-पूत्रावर यापूर्वीही चिखली वाहन जळीत प्रकरणात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल आहे, त्यात आता सदोष मनुष्यवधाचाही समावेश झाल्याने कातोरे पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत.

## पिंपळगाव खांड धरणात अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करून पठार भागाला पाणी देणार : ना. विखे



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

अकोले तालुक्यातील पिंपळगाव खांड धरणात अतिरिक्त पाणीसाठा कसा निर्माण करता येईल, यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमून त्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सकारात्मक निर्णय घेत संगमनेरच्या पठार भागातील जवळे बाळेश्वर सह ११ गावे आणि २१ वाड्यांना पाणीपुरवठा करणे शक्य होईल असे **(पान ३ वर)**

## देव तारी त्याला कोण मारी!

### विजेचा शॉक बसून देखील महिला बचावली

**नायक वृत्तसेवा, घारगाव**



घराजवळील महावितरणच्या पोल वर असणाऱ्या शॉर्टसर्किटची तक्रार महावितरण कर्मचाऱ्यांना देऊन देखील महावितरण कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केले, परिणामी ही वीज वाहक तार तुटल्याने घराजवळ कपडे वाळत घालणाऱ्या महिलेला विजेचा जोरदार धक्का बसला. सुदैवाने यावेळी वीज पुरवठा खंडित झाल्याने ही महिला बालंबाल बचावली. **(पान ३ वर)**

## ४ बंदूकीसह ३४ जिवंत काडतुसे हस्तगत!

### दोन कुख्यात गुन्हेगार ताब्यात

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**



घातपात करण्याच्या हेतूने अग्निशास्त्र घेऊन जात असताना दोन कुख्यात गुन्हेगारांना ४ अग्निशस्त्र, २ मॅग्झिन, ३४ जिवंत काडतुस, ३ मोबाईल फोन व १ लाल रंगाची स्विफ्ट चारचाकीसह पकडण्यात कोतवाली पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई गुरुवार दि.१० जुलै रोजी क्लेरा बुस, हायस्कुल ग्राऊंड येथे **(पान ३ वर)**

अशी संधी एकदाच येते !
MONSOON DHAMAKA
₹1500 ते ₹5000 ची साडी
फक्त ₹499/-
स्टॉक कधीही संपू शकतो आजच भेट द्या !
भंडारी सिल्क ॲण्ड सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर, जि. अहिल्यानगर

## मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाख द्यावेत!



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर गटार मृत्यू प्रकरणातील दोन्हीही मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५० लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून नगरपालिकेकडून देण्यात यावेत अशी मागणी युवा आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेत बोलतांना केली.

आ. तांबे यावेळी म्हणाले, २०२१ साली गटारीची योजना मंजूर झाली. तेव्हापासून या गटारीचे काम चालू आहे. एसटीपी जागेचा वाद असल्यामुळे हे काम पूर्ण होऊ शकले नाही. ती गटार नगरपालिकेने अनधिकृतपणे जोडली आहे. तीच गटार साफ करत असताना दोघांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ठेकेदारावर कारवाई केली मात्र अपूर्ण काम असताना नगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्यांनी ही गटार अनाधिकृतपणे जोडली, त्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे आणि या घटनेतील दोन्ही मृताच्या कुटुंबीयांना नगरपालिकेने प्रत्येकी ५० लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी. ही भरपाई नगरपालिका देऊ शकत नसेल तर सरकारने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ही नुकसान भरपाई द्यावी असेही आ. सत्यजित तांबे यावेळी म्हणाले.

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

ओममयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीचा स्वरूपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)
डॉ.सौ. उज्ज्वला जठार — एम.बी.बी.एस., डी.सी.एच., कन्सल्टंट पेडिॲट्रिशियन, तज्ञ - बालरोग, नवजात अर्भक, प्रिमॅच्युअर बेबी केअर
डॉ.नितीन जठार — एम.बी.बी.एस. डी.टी.सी.डी., कन्सल्टंट फिजिशियन, तज्ञ - छातीचे, हृदयरोग, टी.बी. व दम्याचे विकार
उपलब्ध निदान सुविधा: अत्याधुनिक अतिदक्षता विभाग, जनरल सर्जरी, आपत्कालिन औषधे व उपचार, मधुमेह व हृदयरोग, दमा व श्वसनाचे, फुफ्फुसासंबंधी औषधोपचार, बालरोग चिकित्सा विभाग, सर्पदंश व विषबाधा, पोटाचे विकार औषधे व शस्त्रक्रिया, किडनी विकार, संधीवात व मनके विकार, मेंदू विकार व शस्त्रक्रिया
सी.टी. स्कॅन, डायलिसीस, डिजीटल एक्स-रे, सोनोग्राफी, 2-डि इको, स्पायरोमेट्री, पॅथोलॉजी (लॅब)

काळे ज्वेलर्स
मार्केट मधील सर्वात कमी भाव | सोने विमा संरक्षण उपलब्ध | सुवर्ण बचत भिशी उपलब्ध
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर 9601222777, 9615222777

SALE 25 TO 50% OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर | सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल (संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

सुविचार : जो निष्पाप असतो, त्याला सुखाची झोप लागते.

# शिक्षणाकडे दुर्लक्ष

एकीकडे महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष काही अस्मितांचे विषय ऐरणीवर आणून आंदोलने करण्याची भूमिका स्वीकारत असताना दुसरीकडे सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या शिक्षण क्षेत्राच्या विषयाकडे लक्ष द्यायला मात्र कोणालाच फुरसत नाही, असे विदारक चित्र दुर्दैवाने समोर आले आहे. सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना राज्यातील शालेय शिक्षणाबाबत जी स्थिती मांडली आहे ती पाहता कोणत्याच राजकीय पक्षाला या विषयावर आंदोलन करावे असे का वाटत नाही. शाळांचीच स्थिती अत्यंत वाईट आहे याकडे कोणाचेच लक्ष नाही. शालेय शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत दिलेल्या आकडेवारीप्रमाणे, राज्यात तब्बल ८ हजार १२३ गावांमध्ये शाळांची सुविधा उपलब्ध नाही. १६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा आणि ६ हजार ५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे समोर आले आहे. एवढेच नाही तर ज्या शाळा सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत त्यापैकी अनेक शाळांमध्ये वीज, पिण्याचे पाणी, मुले-मुलींसाठी स्वतंत्र शौचालय अशा मूलभूत सुविधाही उपलब्ध नसल्याचेही समोर आले आहे. राज्यातील ग्रामीण भागामध्ये ही गंभीर परिस्थिती आहे. एकीकडे महानगरे आणि मोठ्या शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय शाळा आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले असताना आणि या शाळांमध्ये प्रवेश घेणार्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना दुसरीकडे सरकारी आर्थिक पाठबळावर चालवल्या जाणार्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडायच्या मार्गावर आहेत. महानगरामध्ये असलेल्या मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय शाळा किंवा मोठ्या शिक्षण संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेणे हा स्टेटसचा विषय असल्यामुळे लाखो रुपये फी भरून पालक अशा शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेतात. पण ग्रामीण भागातील मुलांना जी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे ती दुर्दैवाने योग्य प्रमाणात उपलब्ध करून दिली जात नाही, हे एक वास्तवही समजून घेण्याची गरज आहे. तुमच्या नेत्यांची मुले कोणत्या माध्यमाच्या शाळेत शिकली किंवा शिकत आहेत या विषयावरून वाद निर्माण करण्यामध्ये तज्ज्ञ असलेले राजकीय नेते ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विदारक परिस्थितीकडे सपशेल दुर्लक्ष करताना दिसत आहेत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये हिंदी विरुद्ध मराठी किंवा इतर कोणत्याही कारणांनी महानगरांमध्ये राजकीय पक्ष आंदोलने करत आहेत किंवा मोर्चेही काढत आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाची परिस्थिती सुधारावी म्हणून कोणत्या राजकीय पक्षाने एखादी भूमिका घेऊन आंदोलनाची घोषणा केली आहे असे दिसून येत नाही. मोठी महानगरे, मोठी शहरे किंवा निमशहरी भागातही आता इंग्रजी माध्यमाच्या शाळा किंवा मोठमोठ्या शिक्षण संस्थांच्या मराठी माध्यमाच्या शाळाही पोहोचल्या असल्याने आसपासच्या ग्रामीण भागातील मुलांचे पालकही याच शाळांमध्ये आपल्या मुलांचे प्रवेश व्हावेत त्यासाठी आग्रही असतात. साहजिकच या मुलांच्या घराजवळ असलेल्या शाळांची परिस्थिती जास्तच बिकट होत आहे. ग्रामीण भागातील अनेक सरकारी शाळांची दुरवस्था कल्पना करण्यापलीकडे आहे. अनेक शाळांमध्ये मोडकळीस आलेले वर्ग आहेत, अनेक शाळांची छपरे गळत आहेत, पावसाळ्यात विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. एकीकडे 'डिजिटल इंडिया'च्या माध्यमातून शाळांमध्ये संगणक पोहोचवण्याचे धोरण राबवले जात असतानाच हे संगणक चालवण्यासाठी मात्र वीज उपलब्ध नाही. विद्यार्थ्यांनी शाळेत यावे म्हणून जी 'शालेय पोषण आहार' योजना सुरू केली आहे तीसुद्धा अनेक शाळांमध्ये अशीच डगमगत सुरू आहे. साक्षरतेचा विचार करता देशातील प्रमुख राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वरचा क्रमांक आहे. पण त्याच वेळी प्राथमिक आणि माध्यमिक शालेय शिक्षणाची ही दुरवस्थाही लक्षात घ्यावी लागणार आहे. महानगरी आणि शहरी क्षेत्रातील भव्य इमारतींमध्ये उभारलेल्या चकचकीत शाळा म्हणजेच खरे शिक्षणक्षेत्र नाही हे समजून घेण्याची गरज आहे. विद्यार्थी ज्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत त्या शाळांची अवस्था चांगली व्हावी यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. ग्रामीण भागातील शालेय शिक्षणासाठी आंदोलन करणे आधुनिक काळातील राजकीय पक्षांसाठी ग्लॅमरस विषय नसेल, म्हणूनही सर्वच राजकीय पक्षांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले असेल. पण जेव्हा राज्याचे शालेय शिक्षणमंत्री विधानसभेमध्ये राज्यातील ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाची विदारक स्थिती मांडतात तेव्हा सरकारला मात्र त्याची दखल घ्यावी लागणार आहे. विरोधी पक्ष किंवा इतर राजकीय पक्ष आंदोलन करतील किंवा नाही करतील, पण सरकारला मात्र आपली जबाबदारी टाळता येणार नाही. सरकारने आता ग्रामीण भागातील शालेय शिक्षण दुरुस्त करण्यासाठीसुद्धा काही निधी उपलब्ध करून द्यायला हवा. विरोधी पक्ष किंवा इतर राजकीय पक्षांसाठी हा आंदोलनाचा विषय झाला नाही तर सरकारला मात्र या विषयाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. साहजिकच येत्या काही दिवसांमध्ये सरकारतर्फे काहीतरी उपाययोजना केली जाईल, अशी आशा करायला हरकत नाही. ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष कोणालाच परवडणारे नाही, हे समजून घ्यायला हवे.



# दीदींच्या राज्यातलं अराजक

**पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षातील दोन ज्येष्ठ नेत्यांनी कोलकात्यातील एका कायद्याच्या विद्यार्थिनीवरील सामूहिक लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणावर केलेल्या बेजबाबदार, स्त्रीविरोधी आणि असंवेदनशील वक्तव्यांमुळे समाजमन हादरून गेले आहे. या संपूर्ण प्रकारात पुन्हा एकदा पीडितेवरच दोष ठेवण्याचा विकृत आणि लाजिरवाणा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट दिसते. दुःखद बाब म्हणजे ज्या पक्षाचे हे नेते आहेत, त्या पक्षाच्या सुप्रीमो ममता बॅनर्जी स्वतः एक महिला असूनही पक्षात अशा प्रकारचे स्त्रीविरोधी वक्तव्य करणारे नेते बिनधास्तपणे बोलू शकतात, ही बाब चिंताजनक आहे. गुन्हे थांबवणे हे उत्तम प्रशासनाचे एक अंग असते, पण जेव्हा गुन्हा घडतो, तेव्हा त्यावर प्रभावी आणि मानवीय प्रतिसाद देणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे असते. दुर्दैवाने, टीएमसी या दोन्ही बाबतीत अपयशी ठरत असल्याचे चित्र दिसते.**

**■ सरोजिनी घोष,** कोलकाता



महिलांवरील हिंसा आणि गुन्हेगारी वृत्ती का बळावत चालली आहे, याविषयीची चिंता दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत आहे. गेल्या काही वर्षांत महिला अत्याचारांविरोधात व्यापक आंदोलन उभे राहिले, कायदे अधिक कठोर करण्यात आले, पोलीस यंत्रणांना अधिक उत्तरदायी बनवण्याचे प्रयत्न झाले; तरीही बलात्कार, हत्या, मारहाण, छेडछाड, शेरेबाजी यांसारख्या गुन्ह्यांत फारशी घट दिसून आलेली नाही. राष्ट्रीय गुन्हे नोंदवही ब्युरो (एनसीआरबी) व महिला आयोगांच्या अहवालांनुसार दरवर्षी महिलांवरील अत्याचारांच्या घटनांत वाढच नोंदली जाते. साहजिकच, यामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्था यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. परंतु मूलभूत प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे, तो म्हणजेह्न गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण का होत नाही?

काही महिन्यांपूर्वी कोलकात्यात एका वैद्यकीय विद्यार्थिनीवर बलात्कार व नंतर हत्या झाली. त्या घटनेनंतर वैद्यकीय महाविद्यालयांपासून इतर शैक्षणिक संस्थांपर्यंत विद्यार्थी रस्त्यावर उतरले. त्यांनी वाढत्या महिला अत्याचारांविरोधात घोषणाबाजी केली. राज्य सरकारनेही कठोर उपाययोजनांचे वचन दिले. काही प्रशासकीय बदलही करण्यात आले. मात्र त्यानंतर लगेचच एका विधी महाविद्यालयात विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्काराची घटना घडली. विशेष म्हणजे, या प्रकरणात जे विद्यार्थी दोषी ठरवले गेले आहेत, ते कायद्याचे शिक्षण घेत होते. मुख्य आरोपीने पीडितेला विवाहासाठी प्रस्ताव दिला होता. तिने नकार दिला म्हणून त्या मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. इतकेच नव्हे, तिचे छायाचित्रे काढून ती समाजमाध्यमांवर टाकण्याची धमकीही दिली गेली. अत्याचारादरम्यान पीडितेला पॅनिक ॲटॅक आला, मात्र नराधमांनी इनहेलर देऊन तिला बरे करून पुन्हा तिच्यावर अत्याचार केला. या घटनेचा व्हीडीओ देखील आरोपींनी रेकॉर्ड केला.हा प्रकार केवळ अमानवी नसून, मानवतेच्या सगळ्या मर्यादा ओलांडणारा आहे.

या प्रकरणातील आरोपींना आपल्या कृत्यांचे कायदेशीर परिणाम ठाऊक नव्हते, असे म्हणता येणार नाही. पण तरीही त्यांनी असा गुन्हा करण्याचे धाडस का केले? याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना कायद्याच्या कचाट्यातून सुटून जाण्याची खात्री होती, असे म्हटल्यास गैर काय? बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये अनेक वेळा न्यायालयात दोष सिद्ध होत नाहीत. यामुळे अनेक गुन्हेगार पुन्हा पुन्हा तशाच कृती करत राहतात. निर्भया प्रकरणानंतर कायदे कठोर करण्यात आले, तरीही अपेक्षित बदल झाला नाही. त्यामुळे या कायद्यांचे पुनरावलोकन व्हावे, अशी मागणी अनेकांकडून सातत्याने केली जात आहे. आर.जी. कर रुग्णालयातील बलात्कार व हत्या प्रकरणानंतर जर शाळा-महाविद्यालयांमध्ये सुरक्षा व्यवस्थेचा खरोखरच विचार झाला असता, तर बहुधा पुढील घटना टळू शकली असती. विद्यार्थ्यांमध्येही गांभीर्य निर्माण झाले असते;. पण तसे झाले नाही. त्यामुळेच पुन्हा एक तरुणी वासनेची शिकार ठरली. याला जबाबदार पश्चिम बंगालमधील सरकारला धरल्यास त्यात चूक काय? कोणत्याही राज्यातील सुशासनाचा खरा निकष हा कायदा-सुव्यवस्थेची स्थिती आणि गुन्हेगारांवरील नियंत्रण हाच असतो. पश्चिम बंगाल सरकार गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवल्याचा दावा सातत्याने करत असते; पण या राज्यात केवळ बलात्काराचे गुन्हेच नव्हे तर संघटित गुन्हेगारी फोफावत चालली आहे.

पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षातील दोन ज्येष्ठ नेत्यांनी या प्रकरणावर केलेल्या बेजबाबदार, स्त्रीविरोधी आणि असंवेदनशील वक्तव्यांमुळे तर संपूर्ण समाजमन हादरून गेले आहे. या संपूर्ण प्रकारात पुन्हा एकदा पीडितेवरच दोष ठेवण्याचा विकृत आणि लाजिरवाणा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट दिसते. या सगळ्यात अत्यंत दुःखद बाब म्हणजे ज्या पक्षाचे हे नेते आहेत, त्या पक्षाच्या सुप्रीमो ममता बॅनर्जी स्वतः एक महिला असूनही पक्षात स्त्रीविरोधी वक्तव्य करणारे नेते बिनधास्तपणे बोलू शकतात, ही बाब चिंताजनक आहे.

ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व, त्यांची राजकीय तीव्रता आणि प्रशासनावरची पकड सर्वश्रुत आहे. पण इतक्या वर्षांच्या सत्तेच्या काळात आपल्या पक्षातील नेत्यांमध्ये संवेदनशीलता आणि जबाबदारीचे भान विकसित करण्यात त्या अपयशी ठरल्याचे हे गंभीर लक्षण आहे. याहून गंभीर बाब म्हणजे अशा प्रकारच्या असंवेदनशील प्रतिक्रिया फक्त पश्चिम बंगालपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. देशभरात कुठेही एखादा भयावह लैंगिक अत्याचार घडला की त्यावर सार्वजनिक वर्तुळात पितृसत्ताक विचारांवर आधारित, पीडितेला दोष देणारी, संकुचित आणि लज्जास्पद वक्तव्ये सातत्याने समोर येतात. या प्रवृत्तीचा सर्वसामान्य महिलांच्या मानसिकतेवर दीर्घकालीन परिणाम होतो आणि सामाजिक मानसिकतेत स्त्रीविरोधी धारणा बळकट होते.

२१व्या शतकात जेव्हा आपण मुक्त समाजाची, समानतेची आणि स्त्रीसन्मानाची भाषा करतो, तेव्हा अशा प्रकारच्या प्रतिक्रियांमुळे हा सारा भंपकपणा उघड पडतो. राजकीय व्यक्तीमत्वांकडून अशा प्रकारच्या विधानांची अपेक्षा न करता, त्यांच्या भूमिकांमधून आदर्श घालून दिले गेले पाहिजेत, अशी अपेक्षा समाज बाळगतो. परंतु जेव्हा हेच लोक संताप आणणारी वक्तव्ये करतात, तेव्हा सार्वजनिक व सामाजिक मूल्यव्यवस्थाच डळमळीत होते. याच लोकांना जनता निवडून संसद व विधानसभा अशा लोकप्रतिनिधी संस्थांमध्ये पाठवते. त्यांचा प्रमुख कार्यभाग कायदे करणे आणि व्यवस्था घडवणे असतो. अशा व्यक्ती जर महिलांबाबत अत्यंत द्वेषपूर्ण आणि हिणकस विचार मांडत असतील तर समाजाला काय दिशा मिळणार?

## सामाजिक


कोलकात्यात घडलेल्या या घटनेनंतर विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे आणि काही आरोपींना अटकही करण्यात आली आहे. हा तपास निश्चितच गरजेचा आहे आणि कायदा आपल्या मार्गाने कार्य करेलच, यात दुमत नाही. पण प्रश्न इतक्यावरच थांबत नाही. जेव्हा एखादी घटना सार्वजनिक संताप निर्माण करते, तेव्हा संबंधित पक्षाने केवळ एक-दोन वक्तव्यांपासून अंतर ठेवण्याने आपली जबाबदारी संपली असे मानू नये. पक्षातील इतर नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी अशा वक्तव्यांवर खुलेपणाने आणि कठोर शब्दांत निषेध व्यक्त करणे आवश्यक आहे. ही मूलभूत सामाजिक बांधिलकी आहे.

ममता बॅनर्जी यांच्यासमोर आता एक गंभीर आव्हान उभं राहिलं आहे. काही वर्षांपूर्वी आर. जी. कर मेडिकल कॉलेज बलात्कार आणि हत्या प्रकरणाने देशभरात प्रचंड संताप निर्माण केला होता. आज पुन्हा तशीच संतापजनक घटना पश्चिम बंगालमध्ये घडली आहे. या पार्श्वभूमीवर, केवळ काही वक्तव्यांवर टीका करून स्वतःची जबाबदारी झटकणं पुरेसं ठरणार नाही. ज्या व्यक्तींनी सार्वजनिक जीवनात स्त्रीविरोधी वक्तव्ये केली त्यांना राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर परिणाम भोगावे लागतील, अशी कारवाई केली पाहिजे. अन्यथा समाजात चुकीचा संदेश जाईल.

स्त्रीसुरक्षेबाबत आणि तिच्या सन्मानाबाबत कोणतेही सरकार, कोणताही पक्ष असो, त्यांच्यावर काही नैतिक आणि घटनात्मक जबाबदाऱ्या आहेत. बलात्कारासारख्या प्रकरणात त्यांनी पीडितेला पूर्ण शारीरिक, मानसिक आणि कायदेशीर आधार द्यायला हवा. हे केवळ दयेच्या किंवा राजकारणाच्या चौकटीत न बसवता मानवी कर्तव्याच्या रूपात पाहणे आवश्यक आहे. गुन्हे थांबवणे हे उत्तम प्रशासनाचे एक अंग असते, पण जेव्हा गुन्हा घडतो, तेव्हा त्यावर प्रभावी आणि मानवीय प्रतिसाद देणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे असते. दुर्दैवाने, टीएमसी या दोन्ही बाबतीत अपयशी ठरत असल्याचे चित्र दिसते.

या घटनांमधून शिकून केवळ गुन्हेगारीविरोधात नव्हे तर स्त्रीच्या सन्मानाच्या मुद्द्यावरही पक्षीय राजकारणाच्या चौकटीपलीकडे जाऊन व्यापक सामाजिक मानसिकतेत परिवर्तन घडवणे ही आजच्या काळाची गरज आहे. वर्तमानातील एकंदरीत चित्र पाहिल्यास आपण एका अध:पतनाच्या दिशेने जात आहोत की काय अशा भीतीने थरकाप उडतो. युवकांची मानसिकता अशी हिंसक का बनते आहे? एखाद्या नकाराला ते इतका टोकाचा प्रतिसाद का देतात? प्रेमात नकार आला म्हणून बलात्कारासारख्या गुन्ह्यापर्यंत जायचे, ही प्रवृत्ती ही केवळ लैंगिक विकृती नाही, ती सत्तेची, वर्चस्वाची आणि स्त्रीविरोधी मानसिकतेची अभिव्यक्ती आहे. ही समस्या केवळ कायद्यांची नाही, तर समाजाच्या मानसिकतेची आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणसंस्थांमध्ये लैंगिक समानतेचे आणि स्त्री-पुरुष नात्यांतील समजूतदारपणाचे शिक्षण आवश्यक आहे. कायदे कठोर हवेतच, पण त्याबरोबर पोलिसी यंत्रणेची सजगता, न्यायव्यवस्थेची गती, आणि सामाजिक सजगतेची गरज अधिक आहे. अशीच एक नवी घटना उद्या पुन्हा घडेल ह्न आणि आपण पुन्हा संताप व्यक्त करत राहू.

# सामना ब्रेन हॅमरेजचा



मेंदू हा मानवी शरीरातील सर्वात जटिल आणि संवेदनशील अवयव असून त्याचे कार्य अखंड चालू ठेवण्यासाठी सातत्याने आणि समतोल रक्तपुरवठा आवश्यक असतो. मात्र, मेंदूतील रक्तवाहिन्यांपैकी एखादी अचानक फुटली किंवा त्यातून रक्तस्राव होऊ लागला, तर त्याला 'मेंदूतील रक्तस्राव' म्हणजेच ब्रेन हॅमरेज असे म्हणतात. ही स्थिती आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असते कारण रक्तस्राव झाल्यामुळे मेंदूच्या पेशींवर दाब निर्माण होतो, त्या पेशींना पुरेशा प्रमाणात प्राणवायू मिळत नाही आणि त्यामुळे त्या मृत होण्याचा धोका वाढतो. या अवस्थेमुळे रुग्णाच्या शरीरातील अनेक कार्ये तात्काळ बंद पडू शकतात आणि काही वेळा मृत्यूदेखील होऊ शकतो.

मेंदूतील रक्तस्राव हा 'स्ट्रोक'चे एक रुप आहे. विशेषतः ही अवस्था हेमोरेजिक स्ट्रोक म्हणून ओळखली जाते. काही रुग्णांमध्ये रक्तवाहिन्यांमध्ये गाठी किंवा कमकुवतपणा असतो. अशा वेळी पडण्यामुळे, अपघातामुळे किंवा मार लागल्यामुळे त्या कोणत्याही क्षणी फुटण्याची आणि अचानक रक्तस्राव होण्याची शक्यता असते. गंभीर स्वरूपाच्या रक्तस्रावात शस्त्रक्रियेची गरज भासते.

काही वेळा शस्त्रक्रियेनंतरही मेंदूत रक्ताची गुठळी पुन्हा तयार होण्याची शक्यता असते. त्यामुळे हाता-पायांची हालचाल करण्यात अडथळा निर्माण होणे, हातांना संवेदना न जाणवणे, हातांनी काही उचलता न येणे अशी लक्षणे दिसू लागतात. अशा वेळी पुन्हा शस्त्रक्रिया करण्याशिवाय पर्याय उरत नाही. मुळात, जेव्हा एखाद्या आजारावर, व्याधीवर औषधोपचार उपलब्ध नसतील तेव्हा शस्त्रक्रियेचा मार्ग निवडला जातो. पण पर्याय उपलब्ध असताना त्याचा अवलंब का करु नये?वास्तविक पाहता, अशा रुग्णांसाठी होमिओपॅथी उपचारपद्धती प्रभावी ठरत असल्याचे दिसून आले आहे.

मध्यंतरी एका साठ वर्षीय गृहस्थांना एकदा मेंदूची शस्त्रक्रिया झाल्यानंतरही पुन्हा हातांमध्ये संवेदना (सेन्सेशन्स) न जाणवणे, वस्तू उचलता न येणे अशी लक्षणे दिसू लागली होती. त्यांना न्युरोसर्जननी पुन्हा ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला होता. परंतु त्यांनी शस्त्रक्रियेस तीन महिन्यांचा कालावधी असल्याने यादरम्यान होमिओपॅथी उपचार घेण्याचे ठरवले.

होमिओपॅथी ही एक पर्यायी आणि सखोल सैद्धांतिक पाया असलेली प्रणाली म्हणून ओळखली जाते. होमिओपॅथी एका विशिष्ट तत्त्वावर आधारित आहे. होमिओपॅथी ही केवळ लक्षणांवर उपचार करणारी पद्धत नाही, तर ती माणसाच्या संपूर्ण प्रकृतीचा अभ्यास करते आणि शरीरातील नैसर्गिक संतुलन पुनःस्थापित करण्यास मदत करते. प्रत्येक माणसामध्ये एक जीवनशक्ती किंवा व्हायटल फोर्स असतो. ही जीवनशक्ती त्याच्या आरोग्याची राखण करते. जेव्हा ही शक्ती असंतुलित होते, तेव्हा रोग होतो. होमिओपॅथिक औषधे या जीवनशक्तीला बळ देतात, त्याचे संतुलन पुन्हा प्रस्थापित करतात आणि नैसर्गिकरित्या शरीरास आजारांशी लढण्यास सक्षम करतात. रोगाच्या किंवा व्याधीच्या मुळाशी जाऊन दिलेल्या उपचारांमुळे शरीरात त्या आजारांविरुद्ध नैसर्गिक प्रतिकारशक्ती विकसित होते. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयानेही कोविड काळात याची शिफारस केली होती.

रुग्णावर उपचार करताना होलिस्टिक म्हणजेच सर्वंकष विचार करुन औषधे दिली जातात. यासाठी रुग्णाचा स्वभाव, व्यक्तिमत्व, सवयी, शरीराची ठेवण या सर्वांचा सूक्ष्म अभ्यास केला जातो. हा सर्व विचार करुन मग औषधोपचार केले जातात. औषधोपचार सुरू झाल्यानंतर रुग्णाची झोपेची गुणवत्ता सुधारते, शांत झोप लागते, पचनक्रिया सुरळित होऊन भूक वाढते. या सर्व गोष्टी रुग्णाची प्रतिकारशक्ती वाढत असल्याचे संकेत देणाऱ्या असतात. शरीराच्या या प्रतिकारशक्तीचा उपयोग करुन तिच्या साहाय्याने व्याधींशी सामना केला जातो आणि रुग्णांना आजारातून बरे केले जाते. रोगप्रतिकारशक्ती ही निसर्गतः लाभलेली असतेच; पण ती कमी पडत असल्यामुळे विविध प्रकारच्या व्याधी निर्माण होतात, संसर्ग होतात. पण ती अधिक सक्षम केल्यास आजारांविरुद्धची लढाई जिंकता येणे सहजशक्य होते. सदर रुग्णाबाबतही त्यांच्या एकूण जीवनशैलीचा, व्यक्तिमत्वाचा अभ्यास करुन केलेल्या उपचारांमुळे हातातील संवेदना पुन्हा निर्माण झाल्या, हालचाली पूर्ववत झाल्या. परिणामी, दुसऱ्यांदा करावी लागणारी शस्त्रक्रिया टळली.

'न्यूरोलॉजी' या अमेरिकन अकादमी ऑफ न्यूरोलॉजीच्या वैद्यकीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासामध्ये जर्मनीतील युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटर हॅम्बुर्ग-एपेनडॉर्फ येथील न्यूरोसर्जन डॉ. ऑलिव्हर हीजे यांनी स्पष्टपणे नमूद केले की, होमिओपॅथीसारख्या पर्यायी उपचारांचा वापर बहुतांश वेळा दुर्लक्षित किंवा कमी लेखला जातो. पण वैद्यक व्यावसायिकांनी रुग्णांच्या पर्यायी उपचार घेण्याच्या इच्छेचा आदर केला पाहिजे. होमिओपॅथी ही सर्वंकष उपचारपद्धती असल्याने दुर्धर व्याधींमध्येही ती प्रभावी ठरते.

**- डॉ. नितीन दर्डा,**
**संपर्क ९४२०८६१५४७**

पान १ वरुन

### हलगर्जीपणातून दोघांचा जीव घेणाऱ्या तिघांविरुद्ध सदोष..

काम सुरु आहे. यादरम्यान कोल्हेवाडी रस्त्यावरील पाबळे वस्तीच्या कॉर्नरवर गटार तुंबल्याने मुस्ताक शेख या ठेकेदाराने पालिकेची कोणतीही परवानगी न घेता परस्पर अनेक दिवस बंद असलेल्या गटारात एकाला उतरवले बराच वेळ त्याच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्याला पाहण्यासाठी अन्य दोघे खाली उतरले. मात्र त्यांनाही अस्वस्थ वाटू लागल्याने हा सगळा प्रकार समोर आला. त्यात दुसऱ्या तरुणाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे व शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्यासह पोलिसांनी जमावाची समजूत काढीत आज पहाटे प्रकल्पाचे मुख्य ठेकेदार रामहरी कातोरे यांच्यासह त्यांचा मुलगा निखिल आणि शहरातील गटारींवर अधिराज्य गाजवणाऱ्या मुस्ताक शेख अशा तिघांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला असून या तिघांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. या घटनेत ठेकेदारांच्या हलगर्जीपणाने दोघा तरुणांचा बळी गेल्याने शहरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून समजलेल्या माहितीनुसार सदरची घटना गुरुवारी (ता.१०) दुपारी चार वाजेच्या सुमारास कोल्हेवाडी रस्त्यावरील पाबळे वस्तीकडे जाणाऱ्या एका कॉर्नरवर घडली. याबाबत संगमनेर नगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक अमजद पठाण यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यात त्यांनी म्हटले आहे की, गुरुवार दि. १० जुलै रोजी शहरातील कोल्हेवाडी रोडवर पाबळे वस्तीकडे जाणाऱ्या कॉर्नर जवळील गटार साफसफाई करतांना अतुल रतन पवार (वय १९, रा. संजय गांधी नगर, वडार वस्ती संगमनेर) या मजुराचा व त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या रियाज जावेद पिंजारी (वय २१, रा. मदिनानगर, संगमनेर) यांचा दुर्दैवी मृत्यु झाला असुन त्यांसदर्भात ठेकेदार मे. आर. एम कातोरे अँड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे व निखील रामहरी कातोरे (रा. गोविंद नगर, संगमनेर) मे. बी.आर. क्लिनीग करीता, मुश्ताक बशीर शेख (रा. शिवाजीनगर, संगमनेर) यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करणेबाबत नगरपरिषद संगमनेर या कार्यालयाकडील जा. क्र. सं. न. प./आरोग्य- ४/८३२०२५/३९२ दि. १० जुलै २०२५ अन्वये प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, संगमनेर यांनी मला प्राधिकृत केले असुन सदर घटनेसंदर्भात माझी फिर्याद अशी की, संगमनेर नगरपरिषद हद्दीतील गटारीवरील चेंबर नगरपरिषदेने भुमिगत गटार योजनेसाठी जा. क्र. बांध/१४/१५५५/२०२१ दि. १२/७/२०२१ अन्वये मे. आर. एम. कातोरे ॲड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे व निखील रामहरी कातोरे रा. गोविंद नगर, संगमनेर यांना दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार भुमिगत गटार योजनेचे काम दिले आहे. या कार्यारंभ आदेशानुसार भुमीगत गटार योजनेचे काम पुर्ण झालेले नाही, व त्यामुळे ते अद्याप नगरपरिषदेकडे ठेकेदाराने हस्तांतरीत केलेले नाही. भुमीगत गटार योजनेचे संपुर्ण काम पूर्ण झाल्यानंतर ते नगरपरिषदेकडे रितसर हस्तांतरीत होई पर्यंत योजनेतील सर्व बाबींच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ही ठेकेदार यांचेशी झालेल्या करारनाम्यातील अट क्रमांक ३८ नुसार ठेकेदार मे. आर. एम कातोरे ॲड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे व निखील रामहरी कातोरे रा. गोविंद नगर, संगमनेर यांची आहे. तसेच भुमिगत गटार योजनेत बांधलेल्या या चेंबरची देखभाल व दुरुस्ती करण्याची संपूर्ण जबाबदारी ही सर्वस्वी मे. आर. एम कातोरे ॲड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे व निखील रामहरी कातोरे रा. गोविंद नगर, संगमनेर यांची आहे.

संगमनेर नगरपरिषद मार्फत आरोग्य विभागाकरीता संगमनेर शहरातील व उपनगरीतील मोठ्या व बंदिस्त गटारी साफ करणे करीता संगमनेर नगरपरिषद कार्यालयाकडील जावक क्रमांक सं. न. प./आरोग्य/३३१/१०/२०२४ दि. ७.८.२०२४ अन्वये कार्यारंभ आदेश हे मे. बी. आर. क्लिनीग करिता, प्रो. मुश्ताक बशीर शेख रा. शिवाजीनगर, संगमनेर यास दिनांक ७.८.२०२४ रोजी पासुन एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आली होती. सदर बाबत दि. ६.८.२०२४ रोजी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता गटारी साफ करणेबाबत कामाचा करारनामा मे. बी. आर. क्लिनीग करिता, प्रो. मुश्ताक बशीर शेख रा. शिवाजीनगर, संगमनेर याचे सोबत करण्यात आला होता. सदर करारामध्ये एकुण १ ते ३० अटी व शर्ती नमुद ठेकेदारास

देण्यात आल्या होत्या. तेंव्हापासुन मे. बी. आर. क्लिनीग करिता, प्रो. मुश्ताक बशीर शेख रा शिवाजीनगर, संगमनेर हा त्याचेकडील असलेल्या मजुरांकडुन संगमनेर शहरातील व उपनगरीतील मोठ्या व बंदिस्त गटारी साफ करण्याचे काम करत होता,

मे. आर. एम कातोरे अँड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे व निखील रामहरी कातोरे रा. गणेश नगर, संगमनेर यांनी त्यांचेकडील कामाचा ठेका पुर्ण केलेला नव्हता. त्यामुळे त्या कामावरील सर्व जबाबदारी करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार त्यांचेकडेच होती व आहे. दरम्यान करारनाम्याप्रमाणे बंदीस्त व उघड्या गटारी साफ करणेकामी आरोग्य विभागा मार्फत लेखी वर्क ऑर्डर निर्गमीत केल्यानंतरच गटार साफ सफाईचे काम करणे बाबत व परस्पर अथवा विना वर्क ऑर्डर काम न करणेबाबत करारनाम्यात नमुद असताना त्यांनी त्यांचेकडे करारनाम्याचे भंग केला आहे.

तसेच मे. बी. आर. क्लिनीग करिता, प्रो. मुश्ताक बशीर शेख रा. शिवाजीनगर, संगमनेर याने त्याचेकडील मजुरांमार्फत दि. १०.७.२०२५ रोजी दुपारी ४ वाजण्याचे सुमारास आरोग्य विभागाची परवानगी न घेता कोल्हेवाडी रोडवर पाबळे वस्तीकडे जाणाऱ्या कॉर्नर जवळील बंदिस्त गटार साफ सफाईचे काम सुरु केले. नमुद ठेकेदार याने करारनाम्यातील अट क्रमांक २ चे उल्लंघन करून सदरचे काम करण्यास सुरुवात केली. सदरचे काम हे ठेकेदार याने त्याचेकडील मजुर यांची दक्षता न घेता करारनाम्यातील अट क्रमांक ६ चे उल्लंघन करुन आरोग्य विभागाचे पुर्वपरवानगी शिवाय गटारीवरील चेंबर साफ सफाईचे काम सुरु केले. सदर गटार साफ सफाई दरम्यान वापरण्यात येणाऱ्या मजुरांना अपाय होणार नाही याकरीता खबरदारी म्हणुन रबरी हात मौजे, गमबुट, मास्क, गोंगल, कैंप ॲप्रन तसेच गटार स्वच्छ करण्यासाठी सक्शन मशिनचा वापर केला नाही, इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत करारनाम्यातील अट क्रमांक २१ मध्ये नमुद असताना देखील ठेकेदार मुश्ताक बशीर शेख रा. शिवाजीनगर, संगमनेर याने त्याचेकडील मजुर अतुल रतन पवार (वय १९, रा. संजय गांधीनगर, संगमनेर) यास आवश्यक साहित्यानिशी न देता गटारीचे साफ सफाईचे कामास पाठविल्याने नमुद मजुर जखमी झाल्याचे आम्हाला समजले. सदरची घटना घडल्याची माहिती मिळाल्यानंतर मी तसेच मुख्याधिकारी व नगरपरिषदेचे कर्मचारी असे आम्ही घटना ठिकाणी गेलो. घटना ठिकाणी गेल्यानंतर आम्ही गटारीमध्ये बघितले असता ठेकेदाराने गटारीमध्ये पाठविलेला मजुर अतुल रतन पवार व त्याचे सोबत अजुन एक मुलगा हे अत्यावस्थेत गटारीत पडलेले होते. त्यावेळी आम्ही व तेथे जमलेल्या लोंकानी जेसीबीच्या मदतीने त्या दोघांनाही बाहेर काढुन उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये पाठविले, त्यानंतर मला समजले की, ठेकेदार याने गटारीत उत्तरविलेला मजुर अतुल रतन पवार याचा व त्याला वाचविण्यासाठी गेलेला रियाज जावेद पिंजारी (वय २१, रा. मदिनानगर, संगमनेर) या दोंघाचा गुदमरून कुटे हॉस्पिटल येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला आहे.

दि. १०.७.२०२५ रोजी दुपारी ४ वाजण्याचे सुमारास संगमनेर शहरातील कोल्हेवाडी रोडवर एस. टी. पी प्लॅट चे ठेकेदार मे. आर. एम कातोरे ॲड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे व निखील रामहरी कातोरे रा. गोविंद नगर, संगमनेर यांनी नगरपालिकेशी झालेल्या करारनाम्याप्रमाणे काम केले नाही, कराराचे उल्लंघन केले. एस. टी. पी. प्लॅटवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सुरक्षीतते बाबत योग्य ती काळजी घेतली नाही. तसेच पाबळे वस्तीकडे जाणाऱ्या कॉर्नर जवळील गटारीची साफ सफाई करण्याकरीता ठेकेदार. बी. आर. क्लिनीग करिता, प्रो. मुश्ताक बशीर शेख रा. शिवाजीनगर, संगमनेर याने व या दोन्ही ठेकेदारांनी करारानाम्यात दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करुन आरोग्य विभागाच्या पुर्वपरवानगी शिवाय त्याचेकडील मजुरास विनासाहित्य गटारीत उत्तरविल्यास त्याचा मृत्यु घडुन येण्याचा संभव आहे याची जाणीव असताना देखील निष्काळजी पणाचे कृत्य केल्याने त्याचेकडील मजुर अतुल रतन पवार व त्याला वाचविण्यासाठी गेलेला रियाज जावेद पिंजारी या दोंघाचा गटारीमध्ये गुदमरुन मृत्यु झाला असुन त्या दोंघाचे मृत्युस ठेकेदार में आर एम कातोरे ॲड कंपनी करीता रामहरी मोहन कातोरे, निखील रामहरी कातोरे व मे बी. आर. क्लिनीग करिता, प्रो. मुश्ताक बशीर शेख हे कारणीभूत झाले असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान या प्रकरणातील आरोपींना कुठल्याही क्षणी अटक होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान या घटनेतील मृत अतुल पवार आणि रियाज पिंजारी यांच्यावर दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### पिंपळगाव खांड धरणात अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करून..

आश्वासन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिष्टमंडळाला दिले. पिंपळगाव खांड धरणातून तालुक्यातील पठार भागातील जवळे बाळेश्वर सह ११ गावे आणि २१ वाड्यांना पाणीपुरवठा करण्यात यावा यासाठी आमदार डॉ. किरण लहामटे आणि आ. अमोल खताळ यांच्या नेतृत्वात सावरगाव घुलेचे सरपंच नामदेव घुले, डोळासणेंचे उपसरपंच बाळासाहेब काकड, पिंपळगाव देप्याचे माजी उपसरपंच पांडुरंग गुंड, सावरगाव घुलेचे माजी सरपंच अर्जुन लहानु घुले, पत्रकार गोरक्षनाथ मदने यांच्या शिष्टमंडळाने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुंबईतील 'रॉयल स्टोन' या निवासस्थानी भेट घेत आपले गाऱ्हाणे त्यांच्या कानी घातले. आणि श्री बाळेश्वर संयुक्त पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या सभेत झालेल्या ठरावाचे निवेदन जलसंपदा मंत्र्यांना सुपूर्द केले. जलसंपदा मंत्री विखे पाटील यांना दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुक्यातील पठार भाग पर्जन्यछायेच्या अवर्षणप्रवन क्षेत्रात येत असून प्रत्येक वर्षी फेब्रुवारीपासूनच स्थानिक पातळीवर पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते आहे. सदर गावांची पाणीटंचाई निवारणार्थ शासनाला १९७२ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. येथील पाणीटंचाई कायमची दूर व्हावी यासाठी केंद्र शासन पुरस्कृत जलजीवन मिशन योजनेअंतर्गत राज्य शासनाने जवळे बाळेश्वर सह अकरा गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेला अकोले तालुक्यातील पिंपळगाव खांड उद्भवतातून यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर योजनेचे कामही प्रगतीपथावर आहे. श्री बाळेश्वर संयुक्त पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे जवळे बाळेश्वर सह या योजनेत समाविष्ट असलेल्या ११ गावांच्या ग्रामसभेचे ठराव प्राप्त झाले असून या ठरावावर चर्चा करण्यात आली. आणि योजनेत समाविष्ट असलेल्या पठारावरील ११ गावे आणि २१ वाड्यांना पिंपळगाव खांड धरणात पाणीसाठा निर्माण करण्यासाठी 'गोडबोले गेट' बसवण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला असल्याचे म्हटले असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावर कार्यवाही करावी यासाठी हे निवेदन देण्यात आले आहे.

संगमनेरच्या पठार भागातील जवळे बाळेश्वर, सावरगाव घुले, वरुडी पठार, महालवाडी, पिंपळगाव माथा, पोखरी बाळेश्वर, सारोळे पठार, माळेगाव पठार, कर्जुले पठार, डोळसणे, पिंपळगाव देपा या ११ गावांसाठी आणि २१ वाड्यांसाठी तब्बल ६५ कोटी ५० लाखाच्या या योजनेला २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळून २०२३ मध्ये या योजनेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. सध्या या योजनेच्या अनेक गावातील पिण्याच्या पाण्याच्या मनोरा आणि बैठक टाक्यांची कामे झाली आहेत. त्याचबरोबर गाव अंतर्गत आणि वाड्या अंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी आवश्यक असलेल्या अंतर्गत पाईपलाईनही पूर्णत्वास गेल्या आहेत. पिंपळगाव खांड ते या योजनेतील गावे साधारण २३ किलोमीटर अंतरावर एक फुटाचा व्यास असलेल्या मेन पाईपलाईनद्वारे हे पाणी येण्याचे प्रस्तवित आहे. सध्या या योजनेचे काम अकोले तालुक्यातील लिंगदेव पर्यंत पूर्णत्वास गेले आहे. उर्वरित लिंगदेव ते पिंपळगाव खांड या चार किलोमीटरच्या अंतरात हे काम स्थानिक शेतकऱ्यांच्या अडवणुकीमुळे रखडले आहे. त्यामुळे पठारावरील ही महत्त्वाची पाणी योजना पूर्णत्वास जाऊ शकली नाही. त्यामुळे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यातून तोडगा काढावा आणि पठारावरील जनतेला पिण्याचे पाणी द्यावे यासाठी या शिष्टमंडळाने आमदार डॉ. किरण लहामटे, आ. अमोल खताळ यांच्या नेतृत्वात भेट घेऊन त्यांचे याकडे लक्ष वेधले.

त्यावर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पिंपळगाव खांड धरणात अतिरिक्त पाणीसाठा कसा निर्माण करण्यात येईल यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर समतोल राखत योग्य पर्याय निवडून पाणी देण्याची व्यवस्था करू असे आश्वासन दिले.

तब्बल २३ किलोमीटरच्या या योजनेचे काम पठारावरून अकोले तालुक्यातील लिंगदेव पर्यंत पूर्ण झाले आहे. केवळ लिंगदेव ते पिंपळगाव खांड या चार किलोमीटरच्या अंतरात या योजनेला खिळ बसली आहे. पिंपळगाव खांड धरण लाभ क्षेत्रात येणाऱ्या शेतकऱ्यांनी आमचे हक्काचे पाणी आम्ही या योजनेला देणार नाही, त्यासाठी अतिरिक्त पाणी साठा निर्माण केला तर आमचा या योजनेला विरोध असायचे काही कारण नाही असे सांगितले आहे. त्यामुळे ही योजना अद्याप पर्यंत रखडली आहे. त्यामुळे पठारावरील जनतेची तहान भागवायची असेल तर पिंपळगाव खांड धरणात अतिरिक्त पाणी साठा उपलब्ध करण्याची गरज या निमित्ताने निर्माण झाली आहे.

### ४ बंदूकीसह ३४ जिवंत काडतुसे हस्तगत!

करण्यात आली. रोहन राजु गाडे (वय ३०, रा. अपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे, मुळ रा. गाडेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे), नवनाथ अंकुश देणे (वय २९, रा. घर नं. ३९८६, नवनाथ निवास, सुरभी कॉलनी रोड, आपटे सोसायटी, वारजे माळवाडी, ता. हवेली, जि. पुणे) असे पोलिसांनी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. पो. हे. कॉ. सलीम रमजान शेख यांच्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीसांनी वरील दोन आरोपी विरुद्ध गु. र. नं. ६४२/२०२५ भारतीय शस्त्र अधिनियम १९४९ चे कलम ३/२५ (१ ब) (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड हे करीत आहेत.

### देव तारी त्याला कोण मारी!

त्यामुळे देव तारी त्याला कोण मारी या म्हणीचा प्रत्यय घारगावकरांना आला. सदरची घटना काल गुरुवारी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील घारगाव येथे राजेंद्र सुभाष आहेर हे आपल्या कुटुंबासमवेत राहतात. त्यांच्या घराच्या पाठीमागील बाजूस महावितरणची ११ केव्हीची लाईन गेलेली आहे. या लाईनच्या अनेकदा तारा तुटलेल्या आहेत. शॉर्ट-सर्कीटही होत आहे. त्यामुळे धोका होऊ नये यासाठी येथील विजेचे पोल दुसऱ्या ठिकाणी सिफ्ट करावेत यासाठी अनेकदा आहेर यांनी घारगाव महावितरणकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र, महावितरणने याकडे दुर्लक्ष केले आहे. गुरुवारी सकाळी आहेर यांच्या पत्नी दिपाली या धुतलेले कपडे वाळत घालण्यासाठी घराबाहेर आल्या असता अचानक विजेची तार तुटली. त्यामुळे मोठा आवाज झाला. तुटलेल्या वीज वाहक तारेचा दिपाली आहेर यांना जोराचा धक्का बसला, सुदैवाने याच वेळी वीज पुरवठा खंडित झाल्याने दिपाली यांना तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले आणि त्यांचे प्राण वाचले.

या घटनेची माहिती मिळताच सरपंच नितीन आहेर,माजी उपसरपंच सुरेश आहेर, मंगेश कान्होरे, महेश आहेर, अजित आहेर, विशाल खोंड यांसह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती सरपंच आहेर यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. कार्यकारी अभियंता पी. आर. वट्टमवार, उपकार्यकारी अभियंता प्रेमराज पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी येऊन माहिती घेतली.

येथे महावितरणच्या अनेक वीज वाहक तारांना झाडांच्या वेलीचा विळखा पडला आहे. त्यामुळे या तारा एकमेकांना स्पर्श होत असल्याने पुरवठा खंडीत होत असल्याचे प्रकार घडत आहे. त्यातच सातत्याने या तारांचे घर्षण होत असून त्यामुळे या तारा अनेकदा तुटल्या असल्याचे प्रकारही समोर आले आहे. त्यातच घारगाव उपकेंद्रात कार्यरत असलेले वरिष्ठ तंत्रज्ञ व्ही. बी. गाडे हे अनेकदा गैरहजर राहत असल्याच्या तक्रारी स्थानिकांनी केल्या. घटनेच्या दिवशी गुरुवारी ते कार्यालयात हजर नसतानाही त्यांची नोंदवहीत सही आढळून आली. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता वट्टमवार यांचेकडे तक्रार केली. त्यावेळी त्यांनी कायदेशीर कारवाई करणार असल्याचे सांगितले.

नायक ANCHOR

# कॉँग्रेस पक्षात तरुणांना मोठी संधी : डॉ. थोरात



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

काँग्रेस पक्षाला पूर्वीपासूनच त्याग आणि बलिदानाची परंपरा असून काँग्रेसची विचारधारा ही राज्यघटनेचा आदर करणारी सर्वसमावेशक आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. यातून संगमनेर तालुका हा राज्यात प्रगतशील राहिला आहे. ही वाटचाल कायम राखायची असून काँग्रेस पक्षात तरुणांना मोठी संधी असल्याचे प्रतिपादन युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी केले.

घुलेवाडी येथे डॉ. जयश्री थोरात यांच्या उपस्थितीत भर पावसात युवक काँग्रेसच्या १६ शाखांची उद्घाटने करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, माजी जि. प. सदस्य सिताराम राऊत, घुलेवाडीच्या सरपंच निर्मला राऊत, दलित पँथरचे राजू खरात, बाळासाहेब पानसरे, अंकुश ताजणे, हिरालाल पगडाल, डॉ. विजय पवार, राजू आव्हाड, अनिकेत अभंग, रवि गिरी, अभिषेक तामचीकर, जीवन गायकवाड, भास्कर पानसरे, सचिन सोनवणे, सचिन शेलार, अनिकेत सोनवणे, ऋषिकेश काशीद, दीपक पाळंदे, राजेंद्र हातकर, ओम पावबाके, संतोष खरात, विशाल कांडेकर, निखिल गुंजाळ, गणेश नवले ,कांचन आव्हाड, ओंकार बिडवे, शरद पावबाके ,नितीन साळुंखे, शुभम ढमाले, आकाश पानसरे, स्वाती राऊत, तानाजी शिरतार, रवी दिव्ये, अनिल के राऊत आदींसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सकारात्मक दृष्टिकोनातून सर्वांगीण व्यक्तिमत्व घडते : प्राचार्य दिघे

**नायक वृत्तसेवा, तळेगाव दिघे**



संवाद कौशल्य, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रसंगावधान यामधून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व घडत असते असे विचार समुपदेशक, प्रेरक वक्ते व स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियमचे प्राचार्य रमेश दिघे यांनी व्यक्त केले. संगमनेर तालुक्यातील निमोण येथील हरिभाऊ सांगळे यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सॉफ्ट स्किल्स विषयावर प्राचार्य दिघे बोलत होते. विद्यालयाचे प्राचार्य सुदाम गोर्डे व इन्चार्ज ज्ञानदेव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्किल स्पार्क करिअर मंत्र व्याख्यानमाला शैक्षणिक उपक्रम २०२५-२६ या वर्षासाठी सुरू करण्यात आला.

सॉफ्ट स्किल्स विषयावर बोलतांना प्राचार्य दिघे म्हणाले कि, सॉफ्ट स्किल्समुळे व्यक्तीचे वर्तन, विचार, आणि लोकांशी वागणं अधिक प्रभावी होतं. सॉफ्ट स्किल्स केवळ यशस्वी करिअरसाठीच नाही, तर समाधानी जीवनासाठीही अत्यंत गरजेचे आहे.

ही कौशल्ये विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी बळ देतात. कठीण प्रसंगातही समजूतदारपणे निर्णय घेण्याची शक्ती सॉफ्ट स्किल्समुळे मिळते. प्रास्ताविक पर्यवेक्षक बी. आर. पिंगळे यांनी केले. आभार शिक्षक प्रतिनिधी सुनील पवार तर सूत्रसंचलन

बी. डी .घुगे यांनी केले. इन्चार्ज ज्ञानदेव कांबळे, मल्हारी शिंदे, नवनाथ कोहकडे, अबु इनामदार, याकूब तांबोळी, रामदास भोसले, संतू पर्बत आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रसंगी पालक प्रतिनिधी अनिल शिवाजी घुगे,अनिल बबन घुगे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विकणे आहे**

संगमनेरमध्ये नवीन नगर रोड येथील तुलसी प्लाझा कॉम्प्लेक्स, इथापे हॉस्पिटल जवळ, ३ गाळे एकूण १०३० स्के. फुट व १ गाळा ८० स्के. फुट असे एकूण १११० स्के. फुट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
मो-९४२२२२३१९४, ७०२०६३७३५३

**पाहिजेत**

दुकान कामासाठी
लेडीज, जेन्ट्स पाहिजेत
अनभुवीस जास्त प्राधान्य
आकर्षित पगार दिला जाईल.
भंडारी सिल्क ॲण्ड सारीज संगमनेर
मो.बा.७६६६८०५८१९

**पाहिजेत**

जेन्ट्स सेल्समन - २ जागा
लेडीज सेल्समन - ३ जागा
कॉम्पुटर ऑपरेटर - २ जागा
सारिका ड्रेसेस
बाजार पेठ ,संगमनेर
संपर्क- ९८२२३५८३३५







'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

**पाहिजेत**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654

**विकणे आहे**
नाशिक-पुणे महामार्ग लगत
कलेक्टर एन.ए., पहिल्या मजल्यावरील
१४०० स्के.फुट हॉल व गाळा त्वरीत विकणे आहे.
पत्ता - नवरंगबाग, नाशिक-पुणे महामार्ग, मालपाणी मल्टीप्लेक्स समोर, घुलेवाडी, संगमनेर
संपर्क : 9226798024 / 8698802424

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
**ताम्हाणे हॉस्पिटल**
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल ॲण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर



**शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..**
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा... राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# संगमनेरात जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा!

## दोनशेहून अधिक स्पर्धकांचा सहभाग; राज्यसंघात जाण्याचीही संधी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

अहिल्यानगर जिल्हा स्पोर्ट् असोसिएशनच्या वतीने पुढील आठवड्यात संगमनेरात जिल्हास्तरीय योगासन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणार्या या स्पर्धेच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेवून त्यांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रशिक्षण दिले जाणार आहे. या दरम्यान राबवल्या जाणार्या निवड चाचणीतून स्पर्धकांना राज्यस्तरीय संघात जाण्याची संधीही उपलब्ध होणार असल्याची माहिती जिल्हा योगासन स्पोर्ट् असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी दिली.

AHMEDNAGAR DISTRICT YOGASANA SPORTS ASSOCIATION

योगासनांना खेळाचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर योगासन भारतच्या माध्यमातून देशभरातील प्रतिभांचा शोध घेवून त्यांना मंच उपलब्ध करुन देण्यात आला. त्यासाठी राज्यपातळीपासून तालुकास्तरापर्यंत संघटनात्मक साखळी निर्माण करुन तळागाळातून योगासनांमधील प्रतिभांचा शोध सुरु झाला. त्याचा परिणाम गेल्या पाच वर्षात पार पडलेल्या खेलो इंडिया, नॅशनल गेम्ससह राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धा आणि नुकत्याच पार पडलेल्या एशियन स्पर्धेसह बिहार खेलो इंडिया स्पर्धेतही महाराष्ट्र संघाने आणि विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील योगासनपटूंनी विशेष कामगिरी करताना शेकडों सुवर्णपदकं पटकावली.

योगासनांमधील अशाच प्रतिभांचा शोध घेवून त्यांना प्रशिक्षण आणि पुढील स्पर्धांसाठी तयारीचा भाग म्हणून जिल्हास्तरावर अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात. पुढील आठवड्यात १७ व १८ जुलै रोजी संगमनेरातील मालपाणी लॉन्स येथे या स्पर्धा होत असून त्यात संपूर्ण जिल्ह्यातून दोनशेहून अधिक योगासनपटू सहभागी होतील असा अंदाज आहे. या स्पर्धेसाठी सब-ज्युनिअर (वय १० ते १४), ज्युनिअर (वय १४ ते १६), सिनिअर (वय १८ ते २८) व सिनिअर ए, बी, सी. (वय २८ ते ५५) याप्रमाणे गटांची विभागणी करण्यात आली आहे. दहा प्रकारांमध्ये होणार्या या स्पर्धेत योगासनपटूंना कोणत्याही दोन प्रकारात सहभागी होण्याची मुभा आहे.

या स्पर्धेत सहभागी होवू इच्छिणार्या योगासनपटूंनी शनिवारपर्यंत ऑनलाईन नावे नोंदणी करावी अधिक माहितीसाठी (९८२३१३८८५६) या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा असोसिएशनचे सचिव उमेश झोटींग व कोषाध्यक्ष कुलदीप कागडे यांनी केले आहे. या स्पर्धेतून राज्य संघासाठीच्या खेळाडूंची निवडही केली जाणार आहे.

# दशकभराच्या प्रतीक्षेनंतरही पुणे-नाशिक महामार्ग रखडलेला!

## आ. सत्यजीत तांबेंनी केले सभागृहात प्रश्न उपस्थित

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

पुणे आणि नाशिकसारखी औद्योगिक शहरे एकमेकांशी जोडणारा हजारो कोटींचा औद्योगिक महामार्ग प्रकल्प सरकारने २०१५ साली जाहीर केला, पण दशकभर उलटत आले तरी कामाला वेग नाही. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील विलंब, शेतकर्‍यांचा विरोध, अलाइनमेंटचा प्रश्न आणि स्थानिक विकासासाठी इंटरचेंजची मागणी असे अनेक मुद्दे उपस्थित करत आमदार सत्यजीत तांबे यांनी पुणे-नाशिक औद्योगिक महामार्गाबाबत संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधले.

या महामार्गाची घोषणा शासनाने २०१५-१६ साली केली होती. राजगुरूनगर, चाकण, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर, सिन्नर, शिर्डी, निफाड मार्गे हा महामार्ग पुढे सुरत-चेन्नई महामार्गाशी जोडला जाणार आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक हा देशातील औद्योगिक गोल्डन ट्रँगल मानला जातो. त्यामुळे हा



महामार्ग केवळ दळणवळणाचे साधन नसून औद्योगिक विकासाचा कणा ठरणार आहे.

मात्र, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत सातत्याने विलंब होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सत्यजीत तांबे यांनी हा विषय प्रभावीपणे मांडत त्यांनी सरकारला विचारले की, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे आणि महामार्गासाठी एकत्रित भूसंपादनाचा विचार सरकार करत असल्याचे पूर्वी सांगण्यात आले. परंतु दोन्ही प्रकल्पांसाठी सुमारे तीस ते चाळीस टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. अशा परिस्थितीत सरकार पुन्हा नव्याने अलाइनमेंट करणार आहे का? असा थेट सवाल त्यांनी केला.आ. तांबेंच्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाची अलाइनमेंट आणि महामार्गाची दिशा एकत्रित करता येईल का, याचा सरकार विचार करत होते. त्यामागे उद्देश असा होता की, शेतकर्‍यांचे नुकसान कमी व्हावे. शिवाय, देशपातळीवरील काही संवेदनशील बाबी लक्षात घेऊन देखील हे बदल अनिवार्य ठरत आहेत.

मंत्री भुसे यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोणत्याही शेतकर्‍यांवर अन्याय होणार नाही. शेतकर्‍यांना विश्वासात घेऊनच भूसंपादन केले जाईल. सरकारची भूमिका पारदर्शक राहील. संगमनेर शहराला जोडण्यासाठी इंटरचेंजचा प्रस्ताव विचाराधीन आहे. हा महामार्ग पूर्णत्वास गेला तर पुणे-नाशिकमधील सध्याचे पाच तासांचे अंतर फक्त तीन तासांत पार करता येईल. त्याचबरोबर अनेक औद्योगिक वसाहती, तीर्थक्षेत्रे आणि गावे या मार्गाने एकमेकांशी जोडली जातील, जे राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी निर्णायक ठरेल.

- या महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेमध्ये शेतकर्‍यांचा काही ठिकाणी विरोध असून त्यांना मिळणाऱ्या मोबदल्यावर समाधान नाही, हे वास्तवही तांबे यांनी स्पष्ट केले. त्यांना अधिकचा मोबदला देण्यात येणार का? यावर सरकारची भूमिका काय आहे, याचे उत्तर त्यांनी मागितले. या महामार्गामध्ये संगमनेरसह अनेक शहरांचा समावेश असून, त्या शहरांना प्रभावीपणे जोडण्यासाठी इंटरचेंजची आवश्यकता आहे, याकडेही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

# पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाची कृती महत्त्वाची : कोकरे




**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

आपल्या लहानसहान सवयींमध्ये बदल घडवून आपण प्लास्टिकचा वापर कमी करू शकतो. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने जबाबदारीने कृती करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संगमनेर शाखेच्या वतीने बुधवारी परिषद स्थापनेच्या दिनानिमित्त श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयात 'प्लास्टिक मुक्त भारत' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संगमनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिकमुक्त भारतासाठीचे महत्त्व पटवून देत प्रभावी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सदस्यतेचे पोस्टरचे कोकरे यांच्या हस्ते व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत अनावरण करण्यात आले. या वेळी शिक्षण प्रसार संस्थेचे सदस्य वालझाडे, उपप्राचार्य ढमक, पर्यवेक्षक गुंजाळ, तसेच विद्यार्थी परिषद संघटनेचे कार्यकर्ते आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम पर्यावरण जागरूकतेसह सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणारा ठरला.

# विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट सहल थेट शेतात...

## विद्यार्थ्यांनी केला शेती, व्यवसाय, ग्रामपंचायत प्रशासनाचा अभ्यास

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



रोज शाळेत जाऊन तोच तोच अभ्यास करुन विद्यार्थी कंटाळतात.विद्यार्थ्यांनाही काहीतरी नवीन हवंच असतं. जर विद्यार्थ्यांना निसर्गाचं शिक्षण दिलं तर विद्यार्थी देखील रमतात. शाळेतील शिक्षण विद्यार्थ्यांना जगाशी लढण्याची ताकद देतं. त्यामुळेच तालुक्यातील चंदनापुरी येथील इनोव्हेटर्स पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट सहल थेट शेतात नेण्यात आली. तेथे विद्यार्थ्यांनी शेती, व्यवसाय, ग्रामपंचायत प्रशासनाचा अभ्यास केला.

चंदनापुरी येथील इनोव्हेटर्स पब्लिक स्कूलच्या इ. ६ वी व ९ वी मधील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट सहल तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथे आयोजित करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्षात लागवड करणे अनुभवण्यासाठी शालेय गणवेशातील विद्यार्थी थेट कोबीच्या शेतात उतरले. लिंबाची बाग, नारळाची उंच उंच झाडे विध्यार्थ्यांनी पुस्तकातून अभ्यासली होतीच, मात्र प्रात्यक्षिकातून अनुभूतीचा हा मोठा धडा मिळाल्यानं त्यांच्या चेहऱ्यावर एक आत्मिक समाधान होतं. ग्रामपंचायत, तलाठी कार्यालयात जाऊन प्रशासकीय कामकाजाची प्रत्यक्ष माहिती घेतली. मूर्तिकारांच्या भेटीतून शिल्पातील सजीवता, कल्पकतेचा विद्यार्थ्यांनी नवीनच अनुभव घेतला. क्षेत्रभेटी सहलीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी गावातील ग्रामपंचायत या ठिकाणी जाऊन गावातील सर्व पायाभूत सुविधा, शिक्षण, लोकसंख्या रचना, जमिनीचे विभागणी, नोकरीच्या संधी, सेंद्रिय शेती व व्यवसाय इत्यादी बद्दल माहिती घेतली. या क्षेत्रभेट सहलीच्या दरम्यान ग्रामपंचायत मध्ये सरपंच व सदस्य, तलाठी, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन इत्यादी मान्यवर उपस्थितीत होते. व त्यांनी सर्व ग्रामपंचायत कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना देऊन मार्गदर्शन केले.

नायक ANCHOR

# रस्त्याच्या साईड पट्ट्यात भरली काळी माती!

## विरगाव फाटा रस्ता बनला धोकादायक

**नायक वृत्तसेवा, अकोले**



तालुक्यातील विरगाव फाटा ते विरगाव दरम्यान साईडपट्ट्यावरील माती, मुरूम वाहून गेल्याने डांबरी रस्त्याला कपारी पडल्या आहेत. या कपारी बुजवण्यासाठी संबंधित ठेकेदाराने चक्क रस्त्याच्या कडेला चर घेऊन जमिनीतील काळी माती साईड पट्ट्या भरण्यासाठी वापरल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे.

सध्या विरगाव ते विरगाव फाटा या रस्त्याच्या कडेला असलेल्या साईड पट्ट्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रस्त्याच्या बाजूला चर खोदून तेथील माती उचलून साईड पट्ट्या भरण्याचे काम सुरू आहे. ही माती ऐन पावसाळ्यात टाकल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल तयार झाला आहे. त्यावरून जाताना दुचाकी वाहने घसरतात, सरकतात तर चार चाकी वाहने चिखलात रुतून बसतात.

परिसरातील रहिवासी तसेच या रस्त्यावरून ये जा करणाऱ्यांसाठी हा रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला असून वाहन चालकांमध्ये या प्रकाराबद्दल संतापची भावना आहे.विरगाव फाटा ते विरगाव या डांबरी रस्त्याच्या बाजूच्या भरलेल्या साईड पट्ट्या खचल्या असून वाहनांची वर्दळ तसेच पावसाने माती वाहून गेली आहे. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक बनल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.







**कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर**
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● अ‍ॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५